
www.esakal.com

# सकाळ

सोलापूर। मंगळवार, १ जानेवारी २०१३ । किंमत ₹ ३

पाने १६ (१२ + ४)

पुणे • कोल्हापूर • नाशिक • मुंबई • औरंगाबाद • सोलापूर • नागपूर • सातारा • जळगाव येथून प्रसिद्ध




# बागायत होऊनही दारफळच्या धान्य बँकेचा विस्तारच!

## विकासात मोठा वाटा; गावकऱ्यांच्या विश्वासाचे, एकजुटीचे दर्शन

**विधायक**

**रजनीश जोशी** : सकाळ वृत्तसेवा

सामान्य शेतकऱ्याची पिळवणूक होऊ नये म्हणून १९६० मध्ये सीना दारफळ या माढा तालुक्यातील गावात धान्य बँक या अभिनव संकल्पनेचा जन्म झाला. काळ बदलत गेला, पिढ्या बदलल्या, बागायत शेती होऊनही धान्य बँक दरदिवशी वृद्धिंगत होत गेली. ही किमया आहे दारफळच्या गावकऱ्यांनी दाखवलेल्या एकीची. परस्परांमधील विश्वासाची. आता दारफळमध्ये दोन धान्य बँका झाल्या आहेत. दोन्ही बँकांनी गावच्या विकासात मोठा वाटा उचललाय. अवघ्या ५० किलो ज्वारीवर या बँकेचं सदस्यत्व मिळतं,

पान २ वर »

### असा होतो धान्य व्यवहार

**पन्नास किलो किंवा त्यापेक्षा जास्त ज्वारी देऊन शेअर दिले जातात. एक क्विंटल धान्याचं कर्ज देताना पाच किलो शेअरपोटी कापून घेतले जातात. वर्षाच्या अखेरीस २० किलो व्याजाचे आणि मूळ मुद्दल एक क्विंटल असं धान्य घेतलं जातं. व्याज, मुद्दल सगळं धान्य रुपानंच नोंदवलं जातं. प्रत्येक दिवाळीला लाभांश वाटप होतो. २०१२ च्या दिवाळीत सभासदांना क्विंटलमागे ४०५ रुपये लाभांश वाटण्यात आला.**



दारफळ (ता. माढा) : सीनामाई धान्य बँकेचे अध्यक्ष कुंडलिक उबाळे यांच्यासमवेत हौसाजी पाटील, शहाजी आतकरे, विलास आडकर, लक्ष्मण कदम, संतोष गवळी व हणमंत उबाळे.



दारफळच्या ग्रामविकास मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या जुन्या धान्य बँकेच्या इमारतीसमोर अध्यक्ष ज्ञानदेव उबाळे यांच्यासमवेत विठ्ठल शिंदे, शहानवाज जिंदाशा सय्यद, नागन्नाथ जगताप, अरविंद बागल.

# बागायत होऊनही दारफळच्या धान्य बँकेचा विस्तारच!

» पान १ वरून

ग्रामविकास मंडळातर्फे चालवल्या जाणाऱ्या धान्य बँकेचे अध्यक्ष ज्ञानदेव उबाळे सांगत होते, म्हणाले,“बऱ्याच छोट्या शेतकरी, शेतमजूर आणि कारागिरांना वर्षाकाठी धान्य कमी पडतं. ही मंडळी मग खासगी सावकाराकडून धान्य घेत. सावकाराला एका क्विंटल धान्याला एक क्विंटल धान्य व्याजापोटी द्यावं लागायचं. शेतातल्या खळ्यावरच सावकाराचा माणूस जाई आणि दुप्पट वसुली करे. तेव्हा सधन क्षेत्र योजनेचे विकास अधिकारी विठ्ठलराव पटवर्धन यांनी (कै.) तुकाराम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली धान्य बँकेची संकल्पना मांडली आणि १५ मे १९६० रोजी ती मूर्त रूपात आली."

२००० पर्यंत धान्याच्या बदल्यात धान्य दिले-घेतले जात असे. पुढं गावाजवळून वाहणाऱ्या सीना नदीला पाणी आलं. भीमा-सीना जोडकालव्यामुळं गावकऱ्यांना हळूहळू बरकत येऊ लागली. ज्वारीकडून लोक उसाकडं वळाले. पण धान्य बँक कायमच राहिली, असं सीनामाई धान्य बँकेचे अध्यक्ष कुंडलिक उबाळे यांनी सांगितले. सीनामाई धान्य बँक ही गावातली दुसरी धान्य बँक आहे. या बँकेचे १७७ सभासद आहेत. तर ग्रामविकास मंडळाच्या धान्य बँकेचे २५४ सभासद आहेत.

### धान्य बँकांची किमया

दारफळमध्ये सध्या दोन बँका कार्यरत आहेत. ग्रामविकास मंडळ संचलित धान्य बँकेनं गावात विठ्ठल-रुक्मिणी मंदिर बांधून दिलं. मागासवर्गीयांसाठी दोन चावड्या बांधल्या. गावातील तरुणांसाठी तालीम बांधून दिली. नवभारत मराठी शाळेसमोरील देवालय, पीराचे देवालय धान्य बँकेच्या फायद्यातून बांधण्यात आले. भूकंपग्रस्त किल्लारी आणि गुजरातमधील भूज येथे धान्यरूपाने मदत पाठवण्यात आली. गावातील दिवाबत्ती, रस्ते, पाणीपुरवठा व पंपदुरुस्ती, स्मशानभूमी रोड, अंतर्गत गटारींचे बांधकाम, आळंदी व पंढरपूर येथे खोलीचे बांधकाम, ग्रामस्वच्छता अभियानासाठी काही निधी देणगी स्वरूपात दिली आहे. ही सगळी मदत कायमस्वरूपी परत न करण्यासाठीच केली आहे. थोडक्यात हा गावच्या विकासात धान्य बँकेने लावलेला हातभार आहे.

### धान्य बँकेला भेट दिलेले मान्यवर

**लोकनायक जयप्रकाश नारायण, मधू दंडवते, पन्नालाल सुराणा, मृणाल गोरे, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, भाई वैद्य, दादा कोंडके, डॉ. द्वारकानाथ लोहिया, बापूसाहेब काळदाते, बाबा आढाव.**

### सीनामाई धान्य बँकेची सध्याची स्थिती

- सभासद १७७.
- शेअर्स ३६७.८५ क्विंटल
- कर्ज ४०८.५० क्विंटल
- लाभांश १ लाख ४७ ८७८ रुपये
- ३ लाख १७ हजार मुदतठेव
- १८ हजार रुपये बचत

### ४०० पोत्यांचे पेव

पूर्वी धान्य बँकेचे चारशे पोती धान्य साठेल इतके मोठे पेव होते. पेव म्हणजे जमिनीत खणलेले बंदिस्त गोडाऊन. या दोन्ही बँकांचे वैशिष्ट्य म्हणजे या बँकांची प्रत्येक वर्षाची वसुली शंभर टक्के आहे. एखादवेळी बिनावारसाचा कर्जदार मृत झाला तर त्याने घेतलेले धान्य गावातील मातब्बर मंडळी, बँकेचे पदाधिकारी भरतात आणि बँकेची वसुली शंभर टक्के करतात. चार लाखांची वार्षिक उलाढाल होते.

### हे आहेत संचालक, सदस्य

हौसाजी पाटील, शहाजी आतकरे, विलास आडकर, लक्ष्मण कदम, संतोष गवळी, अरविंद बागल, शिवाजी बागल, शहानवाज सय्यद, नागनाथ जगताप, हणमंत उबाळे.

ही धान्य बँक पाहून आपापल्या भागात राबविण्यासाठी महाराष्ट्र, आंध्रप्रदेशातून अनेक संस्थांचे प्रतिनिधी आले. सध्या तरी महाराष्ट्रातील ही एकमेव धान्य बँक आहे. पुण्यातील अफार्म संस्थेने बँकेची पाहणी केली. त्याचप्रमाणे नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. स्वामिनाथन यांनी बँकेची माहिती घेऊन गावोगावी अशा बँका स्थापन झाल्या पाहिजेत, असे सांगितले.

**(सीएसई फेलोशिपअंतर्गत केलेले लिखाण)**